RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक १११] सोमवार, नोव्हेंबर २७, २०१७/अग्रहायण ६, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर २०१७

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलक्युएन. १२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२.—ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या पहिल्या अनुसूचीच्या नोंद २ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. एलक्युएन-१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२, दिनांक २६ मे, २०१५ याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, समुचित शासन म्हणून, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रांच्या बाबतीत ज्या घटकाद्वारे बाजारमूल्य गुणले जाणार आहे तो घटक अधिसूचित केला आहे ;

आणि ज्याअर्थी, एक संबद्ध घटक म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) याच्या तरतुदींनुसार विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. अशी विशेष नियोजन प्राधिकरणे, क्षेत्र विकास प्राधिकरणे, शहर औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड, नव-नगर विकास प्राधिकरण, नागपूर सुधार न्यास यासारखी नव-नगर विकास प्राधिकरणे तसेच ज्यांच्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींना अनुसरून विकास आराखडे तयार करण्यात येतात अशा पंढरपूर, शिर्डी यांसारख्या क्षेत्रांसाठी यात्रेकरू विकास प्राधिकरणे यांमधील निवासी, वाणिज्य व औद्योगिक क्षेत्र खेरीज करून इतर अन्य क्षेत्रांच्या बाबतीत ज्याद्वारे बाजारमुल्य ठरवायचे आहे तो घटक २ अधिसूचित करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीच्या नोंद २ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमधील अनुसूचीत,—

(एक) स्तंभ (२) मधील, अनुक्रमांक १, खंड (घ) मधील नोंदीतील " यात्रेकरू विकास प्राधिकरणे " या मजकुरानंतर यांमधील " निवासी, वाणिज्यिक व औद्योगिक क्षेत्र ", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) स्तंभ (२) मधील,अनुक्रमांक ३ मधील नोंदीतील " आणि वनीकरण " या मजकुरानंतर पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

" आणि विशेष नियोजन प्राधिकरणे, क्षेत्र विकास प्राधिकरणे, शहर औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड, नव-नगर विकास प्राधिकरण, नागपूर सुधार न्यास यासारखी नव-नगर विकास प्राधिकरणे तसेच ज्यांच्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींना अनुसरून विकास आराखडे तयार करण्यात येतात अशा पंढरपूर, शिर्डी यांसारख्या क्षेत्रांसाठी यात्रेकरू विकास प्राधिकरणे यामधील निवासी, वाणिज्य व औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. कि. गावडे,**

शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 24th November 2017

*NOTIFICATION*

RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

No. LQN.12/2013/C.R.190/A-2.—Whereas, the Government of Maharashtra being the appropriate Government, has, *vide* Government Notification, Revenue and Forests Department, No. LQN.12/2013/ C.R.-190/A-2, dated the 26th May 2015, issued in exercise of the powers conferred by entry 2 of the First Schedule of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) and of all other powers enabling it in that behalf, notified the factor by which the market value is to be multiplied in respect of the areas specified therein;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to notify the factor 2 by which the market value is to be multiplied in respect of areas other than Residential, Commercial and Industrial area of Special Planning Authorities, Area Development Authorities, New Town Development Authorities, such as City Industrial Development Corporation (CIDCO), Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA), Pune Metropolitan Region Authority (PMRDA), Pimpari-Chinchwad New Town Development Authority (PCNDTA), Nagpur Improvement Trust (NIT), as well as Pilgrim Development Authorities such as Pandharpur, Shirdi etc., for which Development Plans are prepared in accordance with provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966);

Now, therefore, in exercise of the powers conferred by entry 2 of the First Schedule to the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows :—

In the said Notification, in the *Schedule,—*

*(i)* in entry at serial No. 1, in clause *(d),* in column *(2),* before the words " Special Planning Authorities ", the words "Residential, Commercial and Industrial areas in" shall be inserted;

*(ii)* in entry at serial No. 3, in column *(2),* after the words "and afforestation" the following shall be added, namely :—

" and areas other than residential, commercial and industrial areas in Special Planning Authorities, Area Development Authorities, New Town Development Authorities, such as City Industrial Development Corporation (CIDCO), Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA), Pune Metropolitan Region Authority (PMRDA), Pimpari-Chinchwad New Town Development Authority (PCNDTA), Nagpur Improvement Trust (NIT), as well as Pilgrim Development Authorities such as Pandharpur, Shirdi etc., for which Development Plans are prepared in accordance with provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966).".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. K. GAWADE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.